रविवार, दि. ९ नोव्हेबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ७८ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### शेतकरी बांधवांनो, आता रडायचं नाही, सरकारला रडवायचं!

# कर्जमुक्ती नाही तर भाजपा-युतीला मतदान नाही - उद्धव ठाकरे

**परतूर । प्रतिनिधी -** पाटोदा (ता. परतूर) येथे आयोजित शेतकरी संवाद मेळाव्यात माजी मुख्यमंत्री व उद्धव बाळासाहेब ठाकरे (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी खोके सरकारवर जोरदार निशाणा साधत राज्यातील शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या. शेतकरी बांधवांनो, आता रडायचं नाही, तर सरकारला रडवायचं आहे. कर्जमुक्ती नाही, तर भाजपा-युतीला मतदान नाही, असा ठाम इशारा त्यांनी दिला.

गेल्या काही महिन्यांपासून अतिवृष्टी, अवकाळी पाऊस आणि नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. सरकारने दिवाळीपूर्वी मदत देण्याचे आश्वासन दिले होते, मात्र अजूनही नुकसान भरपाई मिळालेली नाही. खोके सरकारने दिलेली आश्वासने फसवी ठरली आहेत. विधानसभेपूर्वी सातबारा कोरा करण्याचे आश्वासन देणाऱ्या सरकारने शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम केले आहे, अशी टीका ठाकरे यांनी केली.

**शेवटी ठाकरे यांनी शेतकऱ्यांना हिम्मत देत म्हटलं, शेतकऱ्यांच्या ठिणगीत हे खोके सरकार जळून खाक होईल. सरकारचे डोळे उघडेपर्यंत आपण एकत्र राहा. आता रडू नका, लढा द्या!**

उद्धव ठाकरे म्हणाले, शेतकरी रडत नाही, तो लढतो. पण या सरकारने शेतकऱ्याला हातावर पोट घेऊन जगायला भाग पाडले आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांनी गावोगावी 'कर्जमुक्ती नाही, तर भाजपा-युतीला मतदान नाही' असे फलक लावून सरकारविरुद्ध एकजूट दाखववी.

ते पुढे म्हणाले, या वर्षी मे महिन्यापासून पावसाने उघडं डोकं पाहिलं नाही. सात महिन्यांपासून सुरू असलेल्या पावसामुळे पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. मात्र प्रशासन अजून पंचनामेही करत नाही. पंचनामे करून घ्या, कारण मी पुन्हा आलो तेव्हा सरकार व प्रशासनाचा पंचनामा मी पाहणार आहे, असा इशारा त्यांनी दिला.

ठाकरे म्हणाले, कर्जमुक्ती आणि नुकसान भरपाई देणे ही सरकारची जबाबदारी आहे. पण हे सरकार शेतकऱ्यांना ५ रुपये आणि गद्दारांना ५० खोके देतं. हीच त्यांची नीति आहे. शेतकरी सरकारच्या अंगावर जाईपर्यंत या सरकारला शुद्ध येणार नाही.

या शेतकरी संवाद मेळाव्यात विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, माजी खासदार चंद्रकांत खैरे, खासदार संजय जाधव, जिल्हाप्रमुख महेश नळगे, उपजिल्हाप्रमुख माधवराव कदम, रामेश्वर अण्णा नळगे, अशोक आघाव, रणजीत गजमल, भारत पंडित, प्रदीप बोराडे, गणेश दराडे, विठ्ठल वटाणे, महादेव बोरुडे, संदीप पाचारे, दीपक काळे, इब्राहिम कायमखानी यांसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## ठाकरेंच्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर

**मुंबई -** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या स्टार प्रचारकांची यादी तयार झाली आहे. ही यादी ४० नावांची असून त्यामध्ये उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे यांच्यासह भास्कर जाधव, आदेश बांदेकर, सुषमा अंधारे, **पान २ वर**

## आचारसंहिता मोडणाऱ्यांवर पोलिसांची नजर; अट्टल गुन्हेगार हद्दपार होणार

### जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांची मोठी पत्रकार परिषद

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील परतूर, अंबड आणि भोकरदन नगरपरिषदेच्या निवडणुकीची घोषणा होताच आजपासून निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली आहे. आचारसंहितेच्या अंमलबजावणीसाठी पोलिसांनी कंबर कसली असून, कायदा-सुव्यवस्थेचा भंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट इशारा दिला की, आचारसंहितेचे **पान २ वर**



### मोठी पत्रकार परिषद

पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेला जालना स्थानिक वृत्तपत्रांच्या संपादक तसेच प्रतिनिधींना डावलून पुन्हा एकदा सोशल मिडीयावर आणि काही अपवाद वगळता अनाधिकृत चॅनल आणि युट्युब चॅनलवरच आपला विश्वास असल्याचे दाखवून दिले आहे. पत्रकार परिषदेचे कुठेही निमंत्रण नाही, पीआरओ जालना या व्हॉटसअप ग्रुपवरही निमंत्रण नाही. नाही बोलवायचे बोलवू नका पण त्या सतिश उर्फ लालाचा गुटखा जालन्यातून हद्दपार करा म्हणजे तुम्हाला मिळालेली बढती योग्य असल्याची म्हणता येईल.

### सदर बाजार अन् चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांची चौकशी करा

## अनाधिकृत दंडातून पाकिटांसाठीचा फंड!

दिवाळीपुर्वीपासून चर्चा अन् पोलीस प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा पाकिट वाटपाचा गंभीर प्रश्नावर पोलीस अधिक्षकांनी मौन बाळगले आहे. या संदर्भात अपर पोलीस अधीक्षक नोपाणी यांची भेट झाल्यानंतर त्यांना या बाबत विचारले असता त्यांनी दिलेले उत्तर पोलीस अधिकाऱ्यांचा निष्काळजीपणाचे मोठे उदाहरण म्हणता येईल. जाहिरातींसाठी फंड नाही, पत्रकारांची संख्या वाढली असे उत्तर त्यांनी दिले होते. पोलीस अधीक्षकांनी आज पत्रकार परिषद घेतल्याचे कळले मात्र, या पत्रकार परिषदेसाठी मोजकेच पत्रकार आमंत्रित होते काही अपवाद वगळता अन्य पत्रकार होते की, नाही ही शंका आहे. असो, फंड नसल्यामुळे अधिकृतरित्या जाहिराती देता आल्या नाहीत. सदर बाजार पोलीस ठाणे व चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांकडून जे पाकीट वाटप झाले, त्यासाठी अनाधिकृतरित्त्या दंड वसुल करण्यात आला आणि त्या दंडातून हे वाटप झाले याबाबत पोलीस अधीक्षक चौकशी करणार का? असा प्रश्न सूज्ञ संपादकमंडळींमधून उपस्थित होतो आहे.

## युवा आदर्श फार्स ...

टॉर्चच्या प्रकाशात
पाहणी पथक फार्स
काय कुठे तपासता
दौडत परतता हॉर्स
आपत्तीग्रस्त रे त्रस्त
गळ्यां लागले फास
भीकवाटा मदतीची
ये तोंडास पानेफास
हिरावून नेले निसर्गे
कष्टांने कमवलेघास
घामा मध्ये चिंबलेले
मोती क्षणात खलास
एसी रुममध्ये बसून
खर्डे कल्पनाविलास
क्लोजर रिपोर्टबनले
नुकसान न हो खास
दमल्या अधिकाऱ्यांस
पुरवावे मदिरा ग्लास
कमी नको सुविधांची
जाणा त्यांचा क्लास
कधी थांबवी कुचेष्टा
सन्मान दे पोशिंद्यास
तो जगवतो जगतास
हवा सचोटीचा ध्यास

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## आमदार खोतकर यांच्या प्रयत्नातून मतदारसंघात विकासगंगा जोमाने वाहतेय!

### दोन कोटी पन्नास लाख रुपयांची कामे मंजूर

**जालना । प्रतिनिधी -** जालना मतदारसंघातील सर्वांगीण विकासाची गती आता आणखी वेगाने वाढली असून आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश लाभले आहे. शासनाने त्यांच्या मागणीवरून ग्रामविकास व पंचायत विभागाच्या शासन निर्णय क्र. विकास २०२५/ प्र.क्र.२९४ ( संगणक क्र. १४०९७८१) योजना ६ दिनांक ०६ नोव्हेंबर २०२५ नुसार मुलभूत सुविधा योजनेतून (२५/१५ ) ग्रामीण भागात पुन्हा तब्बल रु. २ कोटी ५० लाख किंमतीची विकास कामे मंजूर केली आहेत. या मंजुरीमुळे मतदारसंघातील गावोगाव विकासाची नवी पहाट उगवणार आहे.



#### गावोगाव पायाभूत सुविधांचा विस्तार

या मंजूर झालेल्या निधीतून अनेक गावांमध्ये , सभागृह उभारणी, आणि ग्रामपंचायत इमारतींचे बांधकाम या विविध कामांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, *गोंदेगाव येथील श्रीक्षेत्र आंनंगड येथे तब्बल ७० लाख रुपये खर्चाच्या डोम बांधकामासह* नंदापूर, कडवंची, बोरखेडी, सारवाडी ,गुंडेवाडी, सोमनाथ, रामनगर, सावरगाव, शिरसवाडी ,इंदेवाडी, गणेशनगर, सामनगाव, अंतरवाला, मोजपुरी, पाहेगाव,तलाव सावंगी, बाजींउब्रद या गावांमध्ये नवीन सभागृह बांधण्यात येणार आहेत.

#### शासनस्तरावर सातत्यपूर्ण पाठपुरावा

आमदार खोतकर यांनी यापूर्वीही मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, जलजीवन मिशन, पंचायत समिती निधी, जिल्हा परिषद निधी आणि आमदार निधी, जिल्हा नियोजन समीती ,मनरेगा, तांडा वस्ती, जिल्हा वार्षिक योजना यांसारख्या योजनांतून मोठ्या प्रमाणात निधी आणून मतदारसंघात अनेक विकासकामांची अंमलबजावणी केली आहे. यामुळे जालना शहरासह ग्रामीण भागातील विकासाला आणखी गती मिळणार आहे.

#### खोतकर यांची प्रतिक्रिया

आमदार अर्जुनराव खोतकर म्हणाले, गावोगाव मूलभूत सुविधा उपलब्ध होऊन सर्वसामान्य जनतेचे जीवनमान उंचावावे, हीच माझी भूमिका आहे. शासनाकडून मिळणाऱ्या प्रत्येक योजनेंतून आपल्या मतदारसंघात जास्तीत जास्त निधी आणण्यासाठी मी सातत्याने प्रयत्न करत आहे. विकासाच्या माध्यमातून जालना शहरासह ग्रामीण भाग समृद्ध व्हावा, हे माझे **पान २ वर**

## जालना जिल्हा स्त्री रुग्णालयात घाणीचे साम्राज्य; पिण्याच्या पाण्याचा अभाव

### मनसे शहराध्यक्ष राहुल रत्नपारखे यांचा प्रशासनावर गंभीर आरोप

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील गांधीचमन परिसरात असलेल्या जिल्हा स्त्री रुग्णालयातील अस्वच्छता, पिण्याच्या पाण्याचा अभाव आणि प्रशासनाच्या निष्काळजीपणाबद्दल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष राहुल रत्नपारखे यांनी गंभीर आरोप करत प्रशासनाला चोख प्रत्युत्तर दिले आहे.

गर्भवती महिलांच्या उपचारासाठी आणि प्रसूतीसाठी जिल्हाभरातून रुग्ण या रुग्णालयात दाखल होतात. मात्र, रुग्णालयात गेल्या अनेक महिन्यांपासून स्वच्छतेचा बोजवारा उडाल्याचे उघड झाले आहे. रुग्णालयाच्या परिसरात सर्वत्र कचरा, प्लॅस्टिक, वैद्यकीय अवशेष आणि सांडपाणी दिसून येत असून, दुर्गंधीमुळे रुग्ण व नातेवाईकांना असह्य त्रास सहन करावा लागत आहे.

त्यातच, स्वच्छतेच्या अभावामुळे डास आणि मच्छरांची उत्पत्ती वाढली असून संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण झाला आहे. रुग्णालयातील साफसफाई कर्मचाऱ्यांची अनुपस्थिती आणि निष्क्रिय प्रशासनामुळे रुग्ण व नातेवाईकांच्या आरोग्याशी खेळ होत असल्याची मनसेची टीका आहे.

#### पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न

रुग्णालयात पिण्याचे पाणी उपलब्ध नसल्याचे समोर आले आहे. येथे महागडे वॉटर फिल्टर बसवलेले असले तरी ते निष्क्रिय स्थितीत आहेत. त्यामुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना बाहेरून पाणी विकत आणावे लागत आहे. अनेक ठिकाणी टाक्या आणि नळ कोरडे पडलेले दिसत असून, रुग्णालय प्रशासनाकडे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

#### दोन्ही लिफ्ट बंद - रुग्ण त्रस्त

जिल्हा स्त्री रुग्णालयातील दोन्ही लिफ्ट गेल्या काही दिवसांपासून बंद आहेत. त्यामुळे गर्भवती महिला, नवजात बालकं आणि त्यांच्या नातेवाईकांना मजल्यावर जाण्यासाठी पायऱ्यांवरून चढावे-उतरावे लागते, यामुळे मोठा त्रास होत आहे.

#### मनसेचा प्रशासनाला इशारा

या पार्श्वभूमीवर मनसे शहराध्यक्ष राहुल रत्नपारखे यांनी जिल्हा रुग्णालय प्रशासनावर तीव्र शब्दांत टीका केली. त्यांनी सांगितले की, रुग्णांकडून अजूनही डिस्चार्जच्या वेळी पैसे घेतले जात आहेत. अधिकारी वर्ग झोपले आहेत का? सरकारी रुग्णालयात रुग्णांना त्रास देणारे आणि पैशांची उकळपट्टी करणारे कर्मचारी तात्काळ निलंबित केले पाहिजेत.

रत्नपारखे यांनी पुढे प्रशासनाला **पान २ वर**



## संपादकीय

### इतर वेळेच्या फटाके बाजीवर देखील बंदी घाला

फटाके आणि दिवाळी हे समीकरणच आहे. दरवर्षी दिवाळीत मोठ्या प्रमाणात फटाके वाजवले जातात त्यामुळे वायू प्रदूषण तर होतेच पण त्यासोबतच ध्वनी प्रदुषण देखील होते. फटाक्यांचे केवळ इतकेच दुष्परिणाम आहेत असे नाही तर याशिवायही अनेक दुष्परिणाम फटाक्यांमुळे होतात म्हणूनच दरवर्षी दिवाळी आली की शासकीय यंत्रणा, सामाजिक व सेवाभावी संस्था तसेच पर्यावरणवादी संघटना नागरिकांना दिवाळीत जास्त फटाके वाजवू नका असे आव्हान करतात. फटाकेमुक्त दिवाळी साजरी व्हावी यासाठी शासकीय पातळीवर विविध उपक्रम राबवले जातात. शाळा, कॉलेजमधून त्याबाबत जनजागृती केली जाते. फटाक्यांचे दुष्परिणाम समजावून सांगितले जातात आणि ते योग्यही आहे, त्याची गरजही आहे. फटाकेमुक्त दिवाळी साजरी करणे ही काळाचीच गरज आहे. फटाक्यांमुळे अनेक दुष्परिणाम होतात. सरकारी यंत्रणा, सामाजिक व सेवाभावी संस्था तसेच पर्यावरणवादी संघटनांच्या आव्हानांना आणि प्रयत्नांना बऱ्यापैकी यशही मिळत आहे. यावर्षी दिवाळीत फटाके वाजले मात्र मागील वर्षीच्या तुलनेत त्याचे प्रमाण कमी होते. फटक्यांबाबत नागरिकांची जनजागृती होतेय ही अतिशय चांगली गोष्ट आहे. फटाक्यांच्या दुष्परिणामाबाबत नागरिक जागरूक होत आहे ही स्वागतार्ह बाब आहे याबाबत सरकारी यंत्रणा, सामाजिक व सेवाभावी संस्था तसेच पर्यावरणवादी संघटनांचे अभिनंदनच करायला हवे तसेच नागरिकांचेही आभार मानावे लागेल. नागरिकांनी दिवाळीत फटक्यांबाबात जी जागरूकता दाखवली ती इतर वेळेसही दाखवायला हवी. कारण आपल्या देशात केवळ दिवाळीतच फटाके वाजवले जातात असे नाही तर वर्षभर कोणत्या ना कोणत्या कारणांनी फटाके वाजवले जातात मग तो सण, उत्सव असो की आनंदाचा प्रसंग. फटाके वाजवूनच सण - उत्सव, आनंदाचे क्षण साजरे करण्याची प्रथाच पडली आहे. काही लोक नवीन वर्षाचे स्वागत फटाक्यांच्या आतषबाजीने करतात. ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री कानठळ्या बसतील इतकी फटाके वाजवली जातात. थर्टी फर्स्ट साजरा करताना उन्माद दाखवण्याच्या खटाटोपात नागरिक फटकेबाजी करतात. नाताळच्या रात्रीही फटाके वाजवले जातात. ईदच्या दिवशी चांद दिसला की फटाके वाजवले जातात. वाढदिवस साजरा करताना फटाके वाजवण्याचे फॅड हल्ली सुरू झाले आहे. लग्नातही फटाक्यांची आतषबाजी पाहायला मिळते. दिवाळीत फटाके वाजवू नका असे आव्हान करणाऱ्या राजकीय नेत्यांच्या राजकीय मेळाव्यात, विजयी मिरवणुकांतही फटाक्यांची मोठ्या प्रमाणात आतषबाजी होते. दिवाळीत जास्त फटाके वाजू नयेत यासाठी प्रयत्न करणारे या इतर वेळी केल्या जाणाऱ्या फटाकेबाजीकडे मात्र सोईस्करपणे दुर्लक्ष करतात. दिवाळीच्या पाच दिवसांच्या फटाक्यांमुळे जे दुष्परिणाम होतात तेच इतर वेळेच्या फटाकेबाजीतही होतात. त्यामुळे या इतर वेळेच्या फटाक्यांच्या आतषबाजीवर देखील बंधने घातली पाहिजेत. नागरिकांनीही फटाके वाजवूनच आनंद साजरा केला पाहिजे ही मानसिकता बदलायला हवी. नागरिकांनी फटक्यांबाबत जी जागरूकता दिवाळीत दाखवली ती वर्षभर दाखवायला हवी.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# वंदे मातरम् गीताच्या १५० व्या वर्धापनदिनानिमित्त कमलताई जामकर महिला महाविद्यालयात सामूहिक गीतगायनाचा उपक्रम

**परभणी । प्रतिनिधी -** वंदे मातरम या राष्ट्रभक्तीच्या अमर गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी येथील राष्ट्रीय सेवा योजना (छड्ड) विभागातर्फे उत्साहपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या विशेष दिनानिमित्त आयोजित सामूहिक गीत गायन कार्यक्रमास प्राचार्य डॉ. रामचंद्र भिसे यांच्या प्रमुख उपस्थितीत सुरुवात झाली. कार्यक्रमाचे उद्घाटन वंदे मातरम् गीताच्या सुमधुर गायनाने झाले. संगीत विभागाच्या प्रा. डॉ. पल्लवी कुलकर्णी यांनी आपल्या सुरेल आवाजात वंदे मातरम् सादर केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थिनींनी उत्साहाने सामूहिकरित्या गीत गायले आणि देशभक्तीचा उत्सव साजरा केला. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, प्रशासकीय कर्मचारी तसेच ६५ विद्यार्थिनींनी आपला सक्रिय सहभाग नोंदवून देशभक्तीची भावना जागवली. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन प्रा. डॉ. महेश जाधव यांनी केले, तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. नसीम बेगम अब्दुल सलीम यांनी मान्यवरांचे आभार मानून केले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थिनींमध्ये राष्ट्रभक्ती, ऐक्य आणि मातृभूमीप्रती आदरभाव जागवण्याचा सुंदर संदेश देण्यात आला.



# अनेकतेत एकतेचा अनुपम नजारा

## निरंकारी सामूहिक विवाह सोहळा; महाराष्ट्रासह देश-विदेशातील १२६ जोडपी विवाहबद्ध

**जालना । प्रतिनिधी -** ७८ व्या निरंकारी संत समागमाच्या समारोपानंतर समालखा मधील त्याच भव्य मैदानावर सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन उपस्थितीत निरंकारी सामूहिक विवाह सोहळा आपल्या साधेपणाची परंपरा जपत यावर्षीही आयोजित करण्यात आला. या प्रसंगी नवविवाहित जोडपे परिणयसूत्रात बांधले गेले आणि त्यांनी आपल्या नवजीवनाच्या मंगल प्रारंभासाठी सतगुरुंचे शुभ आशीर्वाद देखील प्राप्त केले. हा सोहळा अत्यंत अनुपम आणि प्रेरणादायी ठरला, ज्यामध्ये भारतातील विविध राज्यांमधून बिहार, चंदीगड, दिल्ली, गुजरात, हिमाचल प्रदेश, हरियाणा, जम्मू-कश्मीर, झारखंड, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड यांसह परदेशातील ऑस्ट्रेलिया आणि कॅनडा येथून आलेल्या १२६ नवजोडप्यांनी सहभाग नोंदविला. या पवित्र प्रसंगी सर्व १२६ वर-वधू एकाच स्थानावरून एकात्मता आणि साधेपणाचा सुंदर संदेश देत परिणयसूत्रात बांधले गेले. या वेळी मिशनचे वरिष्ठ अधिकारी, वर-वधूंचे कुटुंबीय आणि श्रद्धाळू भक्तगणांनी या दिव्य आणि भावनिक दृश्याचा भरभरून आनंद प्राप्त केला. कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक जयमाला आणि निरंकारी परंपरेतील सामाईक पुष्पहार या विधीने झाली. त्यानंतर भक्तिभावाने ओथंबलेल्या वातावरणात निरंकारी लावांचे हिंदी भाषेत गायन करण्यात आले, ज्यातील प्रत्येक ओळ नवविवाहितांसाठी आध्यात्मिक संदेश आणि गृहस्थ जीवनाच्या कल्याणकारी शिकवणींनी परिपूर्ण होती. सोहळ्यादरम्यान सतगुरु माताजी आणि निरंकारी राजपिताजींनी नवविवाहित जोडप्यांवर पुष्पवृष्टी करून त्यांना सुखमय, आनंदमय आणि समर्पणमय जीवनाचे आशीर्वाद दिले. हा सोहळा दरवर्षीप्रमाणे या वर्षीही आपला साधेपणा, समरसता आणि एकात्मतेच्या दिव्य संदेशाने उजळून निघाला. हा समारंभ जात, धर्म, भाषा आणि प्रांतीय भेदभाव याच्या पलीकडे जाऊन मानवतेचे सुंदर, सर्वसमावेशक आणि प्रेरणादायी स्वरूप प्रकट करणारा ठरला. सतगुरु माताजींनी नवविवाहित जोडप्यांना आशीर्वाद देताना सांगितले, की आजच्या या पवित्र प्रसंगी सर्व जोडपी सुंदर स्वरूपात सजली आहेत. विवाहित जीवनाची सार्थकता आणि महत्व यावर प्रकाश टाकताना सतगुरु माताजी म्हणाल्या, की हा सोहळा म्हणजे केवळ एक दिवसाचा उत्सव नसून प्रेम, सन्मान आणि सहकार्याने भरलेल्या पवित्र मिलनाचे प्रतीक आहे. विवाहित जीवनात हे समानतेचा आणि सहभागाचा संदेश देणारे आहे. जसे लावांमध्ये सांगितले गेले आहे, की जर आध्यात्मिक प्रयत्नात एकाचा



सहभाग कमी असेल, तर दुसर्याने त्याला प्रोत्साहन द्यावे, जेणेकरून जीवनाची यात्रा संतुलन आणि सामंजस्याने पुढे सुरू राहील.

सतगुरु माताजींनी हेही स्पष्ट केले, की विवाह हा केवळ दोन व्यक्तींचे मिलन नसून दोन कुटुंबांचा पवित्र संगम आहे. या मिलनात दोन्ही पक्ष आपल्या सामाजिक आणि कौटुंबिक जबाबदार्या पार पाडत सेवा, सत्संग, सुमिरण आणि भक्ती मार्गावरील महत्त्वाची कर्तव्ये देखील पार पडतात. शेवटी सतगुरु माताजींनी नवविवाहितांच्या वैवाहिक जीवनासाठी मंगलकामना करत प्रार्थना केली, की निरंकार प्रभूची अनंत कृपा सर्वांवर राहो, आणि हे पवित्र मिलन आनंद, प्रेम आणि सलोख्याचे प्रतीक बनून आयुष्यभर टिकून राहो. संत निरंकारी मंडळाचे सचिव आदरणीय श्री. जोगिंदर सुखीजाजी यांनी माहिती देताना सांगितले, की समाजकल्याण विभागाच्या सहकार्याने या वर्षी सतगुरु माताजींच्या पावन सान्निध्यात सुमारे १२६ जोडपी ही केवळ भारताच्या विविध राज्यांतून नव्हे, तर परदेशांमधूनही सहभागी झाली आहेत.

# शेतकरी खरंच मोठ्या मनाचे असतात हो!

शेतकरी जगाचा पोशिंदा असतो. शेतकरी जगला तरच शेती पिकणार आहे आणि हा देश टिकणार आहे. ज्या दिवशी शेतकरी शेतात अन्नधान्य पिकवायचे बंद करतील त्या दिवशी अख्या जगाला उपाशी मरावे लागेल. उभ्या जगाचा पोशिंदा असणारा शेतकरी आता निसर्गाच्या दुष्टचक्रात अडकला आहे. शेतकऱ्यांच्या नशिबी कायम दुष्काळ येत आहे. जास्त पाऊस पडला तर ओला दुष्काळ पडतो आणि कमी पाऊस पडला तर कोरडा दुष्काळ पडतो. म्हणजे शेतकरी नेहमी दुहेरी नैसर्गिक संकटात अडकलेला असतो. जेव्हा शेतकरी नैसर्गिक व आस्मानी संकटात अडकतो तेव्हा शेतकऱ्यांच्या मदतीला कोणीच धावून येत नाही. मायबाप सरकार देखील शेतकऱ्यांचा वाली बनून येत नाही. निवडणुकीच्या काळात राजकारणी मात्र शेतकऱ्यांच्या हिताच्या मोठमोठ्या बाता मारतात आणि एकदा निवडून आल्यावर पाच वर्षे शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करतात. घर प्रपंच चालवणे, मुला बाळांच्या शिक्षणाला पैसा लावणे, मुलींचे लग्न करणे आणि सुखदुखाला पैसा लावणे या महत्त्वाच्या समस्या सोडवण्यासाठी शेतकऱ्यांना पैशाची नितांत गरज भासते. अशा अनेक आर्थिक समस्या शेतकऱ्यांपुढे आवासून उभ्या ठाकलेल्या असतात. जेव्हा शेतीला पूरक पाऊस पडतो आणि शेत शिवार हिरवळीने नटतो तेव्हा शेतकरी देखील आनंदात न्हाऊन निघतो. मग शेतकऱ्यांचा आनंद गगनात मावत नाही. शेतकरी शेतात भाजीपाला व तरकारी लावतात. आणि बाजारात जाऊन विकतात. तेव्हा शेतकऱ्यांचा शेतमाल व भाजीपाला योग्य भावात कोणीच घेत नाही. शेतकऱ्यांना कधीच योग्य हमीभाव मिळत नाही. ग्राहक दुसरीकडे कुठेही गेले तर घासाघीस करून सामान घेत नाहीत. दुकानदार सांगेल तेवढ्या किंमतीत माल खरेदी करतात. शेतकऱ्यांचे मन देखील खूप मोठे असते. शेतकऱ्या एवढा मोठ्या मनाचा व्यापारी या जगात कोठेच शोधूनही सापडणार नाही. शेतकरी आपला माल देताना ग्राहकाला नेहमी झुकते माप देतो. हा शेतकऱ्यांचा मनाचा मोठेपणा व हाताचा सढळपणा आपल्याला कळतो. शेतकरी आपल्याला माल व भाजीपाला देताना कोणताच विचार न करता सढळ हाताने व मोठ्या मनाने झुकते माप देतो पण आपण शेतकऱ्यांच्या मालाला योग्य हमीभाव का देत नाहीत? शेतकऱ्यांच्या मुलाबाळांचा का विचार करत नाहीत? सरकार शेतकऱ्यांसाठी एवढे निष्ठूर का होत आहे. शेतकऱ्यांप्रती सरकारला काही दयामाया आहे का नाही? सरकार शेतकऱ्यांच्या भावनांचा विचार का करत नाही? नावालाच तुटपुंजी रक्कम देऊन शेतकऱ्यांची फसवणूक व दिशाभूल करत आहे. जाणीवपूर्वक शेतकऱ्यांच्या कोपराला गुळ लावत आहे. शेतकऱ्या एवढे मोठे मन दुसऱ्या कोणाचेच नसते. अहोरात्र शेतात कष्ट करून व घाम गाळून पिकवलेले पीक शेतकऱ्यांना कवडीमोल भावाने विकावे लागत आहे. शासन शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव कधी देणार आहे? सरकार शेतकऱ्यांना बोलाचाच भात आणि बोलाचीच कडी चारत आहे. नुसते पोकळ आश्वासन देऊन शेतकऱ्यांची दिशाभूल करत आहे. आणि इलेक्शन मध्ये मते घेऊन निवडून येत आहे. ज्याप्रमाणे शेतकरी आपल्यासाठी मोठ्या मनाने आणि सढळ हाताने झुकते माप देते त्याप्रमाणेच आपण देखील शेतकऱ्यांना काहीतरी भरीव योगदान देऊन व त्यांना मानसिक आधार देऊन त्यांचे अश्रू पुसावेत. ज्या दिवशी आपण शेतकऱ्या एवढे मोठे मन करून शेतकऱ्यांना सढळ हाताने मदत कराल त्या दिवशी आपल्या देशात आनंदाची मंगलमय पहाट उगवेल आणि देश जगाची महासत्ता होण्याच्या उंबरठ्यावर असेल... आणि तुम्ही जर शेतकऱ्यांसोबत चालढकलपणा करू लागलात तर सर्व शेतकरी एक होऊन तुम्हाला धडा शिकवल्याशिवाय राहणार नाहीत हे त्रिकाला बाधित सत्य कोणालाही नाकारता येणार नाही... त्यासाठी शासनाने शेतकऱ्यांप्रती गंभीर राहून त्यांच्या हिताचे ठोस निर्णय घ्यावेत आणि शेतकऱ्यांना आणखीन मजबूत करावे हीच सरकारला नम्र विनंती...

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे, खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर मो.७४९८७१५६६१**

पान १ वरुन

### ठाकरेंच्या स्टार ...

किरण माने आणि शरद कोळी यांच्या नावाचाही समावेश आहे. महत्त्वाचं म्हणजे, या यादीत खासदार संजय राऊत यांचेदेखील नाव आहे. पण ते सध्या तब्येतीच्या कारणास्तव उपचार घेत आहेत.

शिवसेना ठाकरे गटाने ४० शिलेदारांच्या नावाची यादी राज्य निवडणूक आयोगाला सादर केली आहे. हे ४० शिलेदार राज्य पिंजून काढणार असून सेनेच्या जास्तीत जास्त जागा निवडून आणण्यासाठी प्रयत्नशील असतील.

ठाकरे गटाच्या स्टार प्रचारकांची यादी

१. उद्धवजी बाळासाहेब ठाकरे २. आदित्य ठाकरे, ३. सुभाष देसाई, ४. संजय राऊत, ५. अनंत गीते, ६. चंद्रकांत खैरे, ७. अरविंद सावंत, ८. भास्कर जाधव, ९. अनिल देसाई, १०. विनायक राऊत, ११. अनिल परब, १२. राजन विचारे, १३. सुनील प्रभू, १४. आदेश बांदेकर, १५. वरुण सरदेसाई, १६. अंबादास दानवे, १७. रवींद्र मिर्लेकर, १८. विशाखा राऊत, १९. नितीन बनूगडे पाटील, २०. राजकुमार बाफना, २१. प्रियांका चतुर्वेदी, २२. सचिन अहिर, २३. मनोज जामसुतकर, २४. सुषमा अंधारे, २५. संजय (बंडू) जाधव, २६. किशोरी पेडणेकर, २७. ज्योती ठाकरे, २८. शीतल शेठ-देवरूखकर, २९. जान्हवी सावंत, ३०. शरद कोळी, ३१. ओमराजे निंबाळकर, ३२. सुनील शिंद, ३३. वैभव नाईक, ३४. नितीन देशमुख, ३५. आनंद दुबे ३६. किरण माने, ३७. अशोक तिवारी, ३८. प्रियांका जोशी, ३९. सचिन साठे, ४०. लक्ष्मण वाडले

स्टार प्रचारकांची संख्या वाढवली स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राजकीय पक्षांकडून जाहीर करण्यात येणाऱ्या प्रमुख प्रचारकांच्या संख्येची मर्यादा आता राज्य निवडणूक आयोगाने २० वरून ४० केली आहे. तशी मागणी सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी निवडणूक आयोगाकडे केली होती.

'महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५' मधील परिच्छेद २६ मध्ये प्रमुख प्रचारकांसंदर्भातील तपशील नमूद केला आहे. त्यातील तरतुदींच्या आधारे आणि राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी केलेली मागणी लक्षात घेऊन ही संख्या वाढविण्यात आली आहे. राजकीय पक्षांना प्रमुख प्रचारकांची यादी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी संबंधित जिल्हाधिकारी किंवा महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे सादर करावी लागेल.

### आचार संहिता मोडणाऱ्यांवर ...

उल्लंघन करणाऱ्यांवर, अवैध वाहतूक, पैशांची किंवा दारूची देवाणघेवाण करणाऱ्यांवर कोणतीही सूट न देता तात्काळ कारवाई करण्यात येईल.

बन्सल यांनी सांगितले की, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांना सतर्कतेचे आदेश देण्यात आले आहेत. सर्व संवेदनशील आणि अतिसंवेदनशील भागांमध्ये गस्त वाढविण्यात आली आहे. अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांवर तसेच दारू आणि पैसे वाटपाच्या माध्यमातून मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्यांवर गुन्हे दाखल केले जातील. कायदा सुव्यवस्थेचा बळी देणाऱ्या कोणालाही पोलिसांकडून दया दाखवली जाणार नाही.

त्यांनी पुढे सांगितले की, अट्टल गुन्हेगारांवर देखील विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे. जिल्ह्यातील गुंड प्रवृत्तीचे, वारंवार गुन्हे करणारे आणि निवडणुकीत अडथळा निर्माण करण्याची शक्यता असलेले व्यक्ती ओळखून त्यांची गुन्हेगार परेड घेतली जाईल आणि आवश्यकतेनुसार त्यांना जिल्ह्याबाहेर हद्दपार करण्याची कारवाई करण्यात येईल.

दरम्यान, पोलिसांनी निवडणुकीच्या काळात मतदारांना भयमुक्त वातावरण देण्याचा संकल्प व्यक्त केला आहे. जनतेने कोणत्याही प्रकारच्या दबावाखाली न येता मतदान करावे. जर कोणी गैरप्रकार करताना दिसला, तर नागरिकांनी त्वरित पोलीस नियंत्रण कक्षाला माहिती द्यावी, असेही आवाहन एस.पी. बन्सल यांनी केले.

जिल्ह्यातील पोलीस ठाण्यांना आचारसंहिता नियमांची प्रत देण्यात आली असून, प्रत्येक ठिकाणी निवडणुकीशी संबंधित तपासणी नाके (चेकपोस्ट) उभारण्यात येत आहेत. वाहतूक निरीक्षकांना अवैध रोख, दारू, शस्त्रास्त्र किंवा प्रचारसाहित्याची तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत.

पोलिस प्रशासनाने निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार स्पष्ट आचारसंहिता पाळली जाईल, असे सांगितले असून, प्रत्येक उमेदवार आणि पक्षांनी नियमानुसार वर्तन करावे, अन्यथा कडक कारवाई अनिवार्य असेल, असा इशारा जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांनी दिला आहे.

### आमदार खोतकर ...

ध्येय आहे.

**नागरिकांत उत्साहाचे वातावरण**

मतदारसंघात मंजूर झालेल्या या रु. २ कोटी ५० लाखांच्या विकासकामांमुळे गावोगाव विकासाची नवी उर्जा निर्माण झाली आहे. पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्याने सामाजिक व धार्मिक उपक्रमांना चालना मिळणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांत आनंद व समाधानाचे वातावरण पसरले असून विकासगंगा आता थांबणार नाही, अशी भावना जनतेत व्यक्त होत आहे.

### जालना जिल्हा ...

तगडा इशारा देत म्हटले की, तात्काळ रुग्णालयाची स्वच्छता सुधारली नाही, लिफ्ट सुरू केल्या नाहीत आणि रुग्णांकडून पैसे घेण्याचे प्रकार थांबले नाहीत, तर मनसेच्या वतीने वरिष्ठ अधिकाऱ्यांना जाब विचारत कठोर आंदोलन छेडले जाईल.

या प्रकरणामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून, अनेकांनी सोशल मीडियावरूनही रुग्णालयाच्या परिस्थितीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. रुग्णालय प्रशासनाकडून मात्र याबाबत अधिकृत प्रतिक्रिया मिळालेली नाही.

# मालमत्ता नोंदणीसाठी आता 'त्या' कागदपत्राची गरज नाही!; सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने स्थावर मालमत्ता क्षेत्रात खळबळ

## नोंदणी आणि मालकी हक्कातील तफावतीवर न्यायालयाचे बोट; केंद्र सरकारला कायद्यात बदलाचे निर्देश

**जालना । प्रतिनिधी -** मालमत्ता खरेदी-विक्री व्यवहारांमध्ये क्रांती घडवू शकणारा एक अत्यंत महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. मालमत्तेच्या नोंदणीसाठी आता फेरफार किंवा जमाबंदीचा पुरावा अनिवार्य नसल्याचा ऐतिहासिक निर्णय न्यायालयाने दिला आहे. बिहार सरकारच्या एका नियमाला अवैध ठरवताना न्यायालयाने देशातील मालमत्ता कायद्यांमधील मूलभूत त्रुटींवर प्रकाश टाकला आणि केंद्र सरकारला या कायद्यांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सुधारणा करण्याचे निर्देश दिले आहेत. या निकालामुळे देशभरातील स्थावर मालमत्ता क्षेत्रात मोठी खळबळ उडाली असून, सामान्य नागरिकांच्या मनात आपल्या मालमत्तेच्या सुरक्षेबद्दल चिंता निर्माण झाली आहे.

काय होता वाद? बिहार सरकारने २०१९ मध्ये नोंदणी नियमांमध्ये बदल करून मालमत्तेच्या विक्री किंवा हस्तांतरणासाठी दस्तासोबत विक्रेत्याच्या नावे मालमत्तेचा फेरफार (जमाबंदी) असल्याचा पुरावा जोडणे अनिवार्य केले होते. या नियमामुळे अनेक मालमत्ता व्यवहार थांबले होते. या नियमाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. न्यायालयाने हा नियम नोंदणी कायदा, १९०८ च्या अधिकाराबाहेरचा असल्याचे सांगत रद्दबातल ठरवला. नोंदणी अधिकाऱ्याचे काम केवळ दस्तऐवजाची नोंदणी करणे आहे, मालमत्तेच्या मालकी हक्काची सखोल चौकशी करणे नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

न्यायालयाचे महत्त्वाचे निरीक्षण: न्यायमूर्ती पी. एस. नरसिम्हा आणि न्यायमूर्ती जयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने देशातील मालमत्ता कायद्यांमधील एका मोठ्या विसंगतीवर बोट ठेवले. ते म्हणाले, आपल्या देशात मालमत्ता दस्ताची नोंदणी होते, मालकी हक्काची नाही. नोंदणीकृत दस्त हा मालकीचा केवळ एक प्राथमिक पुरावा मानला जातो, तो अंतिम किंवा निर्णायक नसतो. यामुळेच मालमत्तेचे वाद मोठ्या प्रमाणात वाढले असून, देशातील सुमारे ६६% दिवाणी खटले हे मालमत्तेशी संबंधित आहेत.

या समस्येवर तोडगा म्हणून न्यायालयाने 'ब्लॉकचेन' सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून एक सुरक्षित, पारदर्शक आणि छेडछाड करता न येणारी 'निर्णायक मालकी हक्क' प्रणाली विकसित करण्याची सूचना केली. यासाठी कायदा आयोगाने सर्व राज्यांशी आणि तज्ज्ञांशी चर्चा करून एक अहवाल सादर करावा, असे निर्देशही न्यायालयाने दिले आहेत.

ॲड. महेश एस. धनावत यांची प्रतिक्रिया: या निकालावर आपली भूमिका मांडताना जालना जिल्हा नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष, ड. महेश एस. धनावत म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाचा हा निकाल दूरगामी परिणाम करणारा असून, त्याची योग्य अंमलबजावणी झाल्यास तो संपूर्ण स्थावर मालमत्ता उद्योगाचे चित्र बदलू शकतो. न्यायालयाने नोंदणी आणि मालकी हक्कातील त्रुटींवर अचूक बोट ठेवले आहे. ते पुढे म्हणाले, महाराष्ट्रातही महाराष्ट्र जमीन महसूल संहितेमध्ये नोंदणीकृत दस्ताच्या आधारे फेरफार (म्युटेशन) करण्याची तरतूद आहे, परंतु तिची खऱ्या अर्थाने आणि काटेकोरपणे अंमलबजावणी होत नाही. या प्रक्रियेवर कोणतीही प्रभावी तपासणी यंत्रणा अस्तित्वात नाही. त्यामुळे अनेकदा व्यवहार होऊनही सरकारी दप्तरी मूळ मालकाचेच नाव कायम राहते, ज्यामुळे भविष्यात वाद निर्माण होतात. जर शासनाने फेरफार प्रक्रियेसाठी अधिकृत दर निश्चित केले आणि ही प्रक्रिया जलद केली, तर नागरिक आनंदाने शुल्क भरण्यास तयार आहेत.

नागरिकांच्या हिताचे रक्षण आवश्यक: ड. धनावत यांनी चिंता व्यक्त करताना म्हटले, या निकालामुळे सामान्य नागरिकांच्या मनात आपल्या मालमत्तेच्या सुरक्षेबद्दल संभ्रम निर्माण होईल. आपली मालमत्ता कशी सुरक्षित राहील, याची चिंता त्यांना सतावेल. त्यामुळे सरकारने या विषयात तातडीने हस्तक्षेप करून नागरिकांचे हित जपले पाहिजे. यासाठी आवश्यक असल्यास नवीन कायदा किंवा सुस्पष्ट शासन निर्णय लवकरात लवकर लागू करून मालमत्ता व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणि सुरक्षितता आणावी, ही काळाची गरज आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाने मालमत्ता नोंदणीची प्रक्रिया सुलभ केली असली तरी, मालकी हक्काच्या सुरक्षेचा एक मोठा प्रश्न निर्माण केला आहे. आता चेंडू सरकारच्या कोर्टात असून, जुनाट कायद्यांमध्ये बदल करून नागरिकांना त्यांच्या मालमत्तेची निर्णायक हमी देणारी प्रणाली कधी विकसित होते, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

# जवाहर नवोदय विद्यालय अंबा येथे हस्तकला कार्यशाळा संपन्न

**परतूर । प्रतिनिधी -** पी. एम. श्री. जवाहर नवोदय विद्यालय, अंबा येथे बॅगलेस कटी व्हीटी अंतर्गत हस्तकला कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.




या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत विविध आकर्षक वस्तू तयार केल्या. कार्यशाळेसाठी तज्ज्ञ म्हणून कु. साक्षी राजकुमार भारूका यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी कागद, दोरे, रंगीत साहित्य वापरून सजावटी वस्तू तयार करण्याच्या पद्धती विद्यार्थ्यांना शिकवल्या.

विद्यार्थ्यांनी फ्लॉवर पॉट, पेपर डेकोरेशन, शुभेच्छा कार्डे आणि शोपीस तयार करून आपली कलात्मकता प्रदर्शित केली.हस्तकला म्हणजे हाताने केलेले सर्जनशील कार्य होय. या कलेमुळे विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला नवी दिशा मिळते. अशा उपक्रमांद्वारे विद्यार्थी हे आपली कल्पना साकार करण्याची कला आत्मसात करतात. त्यातून त्यांचे एकाग्रता, संयम, तसेच स्वावलंबन विकसित होते. हस्तकला ही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरते.कार्यक्रमास

प्रभारी प्राचार्य आर. जी. मस्के, नर्मदा मॅडम, रामदास तांदळे, रविशंकर सर तसेच शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. या प्रसंगी प्राचार्य मस्के यांनी विद्यार्थ्यांना सर्जनशीलतेचा विकास आणि स्वावलंबनाचे महत्त्व सांगितले. संपूर्ण कार्यशाळा आनंदी व प्रेरणादायी वातावरणात पार पडली. विद्यार्थ्यांनी नव्या कल्पना मांडत सर्जनशीलता व्यक्त केली. शाळेच्या प्रशासनाने अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते, असे मत व्यक्त केले.

# सत्यशोधक विद्यालयात विद्यार्थी प्रेरणा दिन साजरा



**विशाल देशमुख**

**टेभुर्णी -** मानव विकास व पूर्णनिर्माण संशोधन संस्था औरंगाबाद संचलित सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगाव ता. भोकरदन जि. जालना येथे आज दिनांक ०७/११/२०२५ रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर शाळा प्रवेश विद्यार्थी प्रेरणा दिन साजरा करण्यात आला यानिमित्ताने वंदे मातरम सामूहिक गीत घेण्यात आले तसेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन चरित्रावर निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष तथा प्राचार्य सुनील वाकेकर तसेच संस्थेच्या सचिव जयश्री ताई बनकर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. याप्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

# जालन्याची चिमुकली सिया दांदडे ठरली जागतिक कीर्तीची क्रिएटर!

## इन्फ्लुएंसर बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नावाची नोंद




**जालना । प्रतिनिधी -** फक्त चार-साडेचार वर्षांची असलेली जालना येथील मधुबन कॉलनीतील रहिवासी सिया प्रितम दांदडे हिने आपल्या कलेच्या जोरावर इन्फ्लुएंसर बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये आपले नाव नोंदवून एक अभूतपूर्व यश संपादन केले असून, ही जालन्यासाठी अत्यंत अभिमानास्पद बाब आहे.

सिया हिला या उल्लेखनीय यशासाठी पदक, सुवर्ण स्मृतिचिन्ह, इन्फ्लुएंसर बॅच आणि अधिकृत प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. लहान वयातही आपल्या कल्पकतेच्या आणि अभिनय कौशल्याच्या जोरावर सिया आज एक ओळख निर्माण करत आहे. ती अवघ्या तीन वर्षांची असतानाच व्हिडिओ तयार करू लागली. आज तिच्या प्रत्येक सादरीकरणात कॉमेडी आणि बोधपूर्ण संदेश यांचा सुंदर मिलाफ दिसून येतो. सिया मुख्यतः सासुबाई, सूनबाई आणि नवरा अशी तिन्ही पात्रं स्वतःच साकारते आणि आपल्या गोंडस अभिनयातून प्रेक्षकांना खळखळून हसवते. तिच्या व्हिडिओंना प्रचंड लोकप्रियता मिळत असून हजारो लोक तिच्या कामावर प्रेम व्यक्त करतात.

या यशामागे तिचे वडील प्रितम वसंतराव दांदडे आणि आई सौ. प्रतिभा प्रितम दांदडे यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, प्रेरणा आणि पाठबळ आहे. सध्या हे कुटुंबीय नोकरीमुळे पुणे येथे स्थायिक झाले आहे. सुरेखा वसंतराव दांदडे यांची ती नात आहे. सियाला आतापर्यंत विविध स्तरांवर अनेक पारितोषिके आणि पुरस्कार मिळाले आहेत. तिच्या कलाकृतींना इंस्टाग्रामवर असंख्य आवडी व शुभेच्छा मिळतात. तिचे अधिकृत खाते 'ळ्व्रूवरपवरवशेषषळललरश्र' या नावाने प्रसिद्ध आहे. तसेच तिच्या युट्युब वाहिनीचे नाव 'सियाज स्टाईल' असून सध्या त्या वाहिनीला तब्बल ७६ हजार सदस्य आहेत!फक्त अभिनयच नव्हे, तर सिया ला नृत्य करणे, दैनंदिन अनुभवांवर व्हिडिओ तयार करणे (व्लॉग्स) आणि विविध कलात्मक उपक्रमांमध्ये भाग घेणे अत्यंत आवडते. शैक्षणिक क्षेत्रातही सिया नेहमीच आघाडीवर असते. शाळेत ती नेहमी प्रथम क्रमांक पटकवते, यावरून तिच्या सर्वांगीण प्रगतीचा अंदाज येतो. अवघ्या चार-साडेचार वर्षांच्या वयात सियाने गाठलेले हे शिखर केवळ तिच्या कलेचे नव्हे, तर तिच्या पालकांच्या दूरदृष्टीचेही द्योतक आहे. सिया दांदडे हिच्या या यशामुळे जालना जिल्ह्याचे नाव पुन्हा एकदा उज्ज्वल झाले आहे!

# वंदे मातरम गीत सार्ध शताब्दी महोत्सव उत्साहात साजरा

**परतूर । प्रतिनिधी -** स्वर्गीय दत्ताजी भाले शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था परतुर येथे दि.०७/११/२०२५, रोजी वंदे मातरम सार्ध शताब्दी महोत्सव कार्यक्रमात वंदे मातरम गीत सुमधुर आवाजात रोहित चिंचोडकर यांनी गायले व प्रमुख वक्ते , प्रमोद जायभाय यांनी सखोल व आकर्षक मार्गदर्शन केले तसेच कार्यक्रमाचे प्रमुख म्हणून संस्थेचे आयएमसी सदस्य डॉ. विनोद भाले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले सदरील कार्यक्रमात जायभाय यांनी वसुदेव कुटुंबम ही संकल्पना व शेती उद्योग सेवा ज्ञान या चार भागांचा देशाची प्रगती कशी साधू शकतो हेच हे समजविले तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व आयएमसी चे सदस्य डॉ. विनोद भाले यांनी मोबाईल पासून दूर राहा व आई-वडिलांची सेवा करा आपल्या कामाशी प्रामाणिक राहा तसेच या युगात आयआयटी पेक्षा आयटीआय ची जास्त गरज आहे असे विद्यार्थ्यांना संबोधित केले आहे.



कार्यक्रमाची सुरवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलाने करण्यात आली. त्यानंतर वंदे मातरम हे राष्ट्रदान सामुहिकरीत्या गायले. या वेळी कार्यक्रमात क्रीडा क्षेत्रातील कराटे मास्टर माणिक जैस्वाल. व सौ रेखाताई भाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे प्राचार्य, राजेश धानोरकर. व उच्च प्राथमिक शाळा जवाहर नगर यांचे मुख्याध्यापक, सोमनाथ पांगारकर. त्यांचे विद्यार्थी सेवा साधना गुरुकुल चे संचालक, ठुबे सर व त्यांचे गुरुकुल मधील विद्यार्थी तसेच जिजामाता गुरुकुल चे संचालक,लक्ष्मण अर्दड. त्यांचे विद्यार्थी आदर्श विद्यालय परतुर येथील विद्यार्थी लालबहादूर शास्त्री वरिष्ठ एन एस एस विभागाचे प्रमुख डॉ. नितीन माने.डॉ.वैशाली

चौधरी. डॉ. मीनाक्षी कात्रे. तसेच शिक्षक किरण दळवे. जाधव सर .बागल सर.सर्व मान्यवर व संस्थेतील शिल्प निदेशक शासकीय तांत्रिक विद्यालय केंद्र परतुर येथील शिक्षण कार्यालयीन कर्मचारी, चतुर्थ श्रेणी कर्मचारी मेस्को कर्मचारी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जीएम ढाकरे. आभार प्रदर्शन,एस जी राठोड यांनी केले.व कार्यक्रमाचे सांगता राष्ट्रगीताने पार पाडण्यात आली.

## वंदे मातरम गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त जालना महानगरपालिकेकडून सामूहिक गायनातून देशभक्तीचा अनोखा जल्लोष

**जालना -** भारतीय स्वातंत्र्य संग्रामात देशभक्तीचा प्रखर जाज्वल्य स्वर ठरलेले वंदे मातरम हे राष्ट्रगीत आजही प्रत्येक भारतीयाच्या मनात उर्जा निर्माण करणारे गीत मानले जाते. या अमर गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त जालना शहर महानगरपालिकेत उत्साहपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महानगरपालिकेच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाचे आयोजन मा. अतिरिक्त आयुक्त श्री. अर्जुन गिराम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमास उपायुक्त नंदा गायकवाड, सहाय्यक आयुक्त अर्पणा जाधव व केशव कानपुडे, तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रमातेच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सर्व उपस्थितांनी एकाच सुरात वंदे मातरम् हे गीत सामूहिक स्वरांतून गाऊन देशमातेप्रती आपली कृतज्ञता व्यक्त केली. या सामूहिक गायनावेळी उपस्थितांमध्ये देशभक्तीची उर्जा आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले. अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, वंदे मातरम हे केवळ गीत नाही, तर आपल्या स्वातंत्र्य संग्रामाचे प्रतीक आहे. हे गीत प्रत्येक भारतीयाच्या हृदयात देशभक्तीची ज्योत प्रज्वलित करते. प्रशासनातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांच्यातील राष्ट्रभावना अधिक बळकट करण्यासाठी अशा उपक्रमांची गरज आहे.

# जालना येथे उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** मिटकॉन प्रशिक्षण केंद्र, जालना व उद्योग विकास विभाग आणि शासकीय औद्योगिक विकास महामंडळे यांच्या वतीने जालना येथे दि.१३ नोव्हेंबर २०२५ पासुन एक महीना कालावधीत उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदरील प्रशिक्षण कार्यक्रमात युवक व युवतींसाठी स्वतःचा उद्योग/व्यवसाय उभारणीसाठी व कर्ज प्रकरण करण्यासाठी हा प्रशिक्षण वर्ग अंत्यत महत्त्वाचा राहणार आहे.या प्रशिक्षण कार्यक्रमात सौर ऊर्जा (सोलर एनर्जी) , विद्युत वाहणे (इलेक्ट्रिकल व्हेअकल) व सायबर सुरक्षा व इतर अनेक उद्योगा बाबतीत थेरी व प्रात्येक्षिकासह मार्गदर्शन राहणार आहे. या प्रशिक्षणात मशिनरी हाताळणे, सोलर एनर्जी प्लेट तयार करणे, कच्चामाल, साहीत्य ,कॅप्रीसिटी, जोडणी व विक्रीव्यवस्था, बिघाड दुरुस्ती व उपलब्ध प्लॅन्ट या सोबत उद्योग संधी मार्गदर्शन, उद्योग प्रेरणा, संघटन कौशल्य, उद्योजकीय गुणसंपदा, व्यक्तीमत्व विकास, प्रभावी संभाषण कौशल्य, उद्योग व्यवस्थापन, जागेची निवड, बाजारपेठ पाहनीतंत्र, शासकीय व निमशासकीय योजना, जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजना,खादीग्राम उद्योग मंडळाच्या योजना, महामंडळाच्या विविध योजना, कृषी संलग्न योजना, प्रकल्प अहवाल तयार करणे, कर्ज प्रस्ताव तयार करणे, बँकेची कार्यप्रणाली , विक्री व्यवस्था,भांडवल उभारणी ,मनुष्यबळ , विमा संरक्षण, शासकीय परवाने, प्रशिक्षण प्रमाणपत्र इत्यादी बाबतीत तज्ञ प्रशिक्षक, वरिष्ठ अधिकारी व यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

अधिक माहिती व प्रवेश अर्जासाठी के डी दांडगे ,जिल्हा प्रकल्प अधिकारी ,मिटकॉन द्वारा पत्रकार भवन, एस. पी. ऑफिस समोर , शासकीय ग्रंथालयाच्या बाजूला ,जालना.मो.९४२३७३०९३२ येथे दि.१३ नोव्हेंबर २०२५ पर्यंत संपर्क साधावा असे आवाहन के डी दांडगे मिटकॉन जालना यांनी केले आहे.

# जालना जिल्ह्याचा अभिमान; जैन विद्यालयातील शिक्षिका श्रीमती कीर्ती बेदमुथा यांना 'आदर्श शिक्षिका पुरस्कार'

## मुंबईत भारताच्या पहिल्या महिला आयपीएस अधिकारी मा. डॉ. किरण बेदी यांच्या हस्ते सन्मान

**जालना । प्रतिनिधी** - शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी शस्त्र मानले जाते, आणि या कार्याला आयुष्य समर्पित करणाऱ्या शिक्षकांचा गौरव करणे म्हणजे संपूर्ण शिक्षणव्यवस्थेचा सन्मान होय. याच परंपरेत जालना जिल्ह्याचा मान वाढवणारा अभिमानास्पद क्षण नुकताच मुंबईत पाहायला मिळाला. इंडियन टॅलेंट ऑलिंपियाड या राष्ट्रीय स्तरावरील संस्थेतर्फे आयोजित सोहळ्यात श्री म. स्था. जैन माध्यमिक विद्यालयातील सहशिक्षिका श्रीमती कीर्ती बेदमुथा यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार भारताच्या पहिल्या महिला आयपीएस अधिकारी व प्रसिद्ध समाजसेविका डॉ. किरण बेदी यांच्या हस्ते, दिनांक ४ नोव्हेंबर २०२५ रोजी मुंबई येथे देण्यात आला. श्रीमती बेदमुथा यांनी विद्यार्थ्यांना गणित व विज्ञान विषयात प्रभावी मार्गदर्शन देत अनेक विद्यार्थ्यांना इंडियन टॅलेंट ऑलिंपियाड तसेच इतर राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश मिळवून दिले आहे. त्यांच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशामुळे विद्यालयाचे नाव राज्यभर उजळले आहे.

बेदमुथा मॅडम म्हणाल्या - हा सन्मान माझ्या विद्यार्थ्यांचा आणि विद्यालयाचा पुरस्कार स्विकारल्यानंतर आपल्या भावना व्यक्त करताना श्रीमती कीर्ती बेदमुथा म्हणाल्या, हा सन्मान माझ्या विद्यालयाचा आणि विद्यार्थ्यांचा आहे. शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांच्या प्रगतीत माझं योगदान दिसतंय, हीच माझ्यासाठी सर्वात मोठी प्रेरणा आहे. या सन्मानामुळे पुढील काळात आणखी जोमाने कार्य करण्याची उर्मी मिळाली आहे.






**विद्यालय, संस्था व शिक्षक वर्गाकडून अभिनंदनाचा वर्षाव**

या यशानंतर श्री वर्धमान स्थानकवासी जैन संघ चे अध्यक्ष सुदेशकुमार सकलेचा, सचिव डॉ. धरमचंद गादीया, तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी आणि शालेय शिक्षण समितीचे मान्यवर यांनी श्रीमती बेदमुथा यांचे अभिनंदन करून त्यांच्या कार्याचे कौतुक केले. तसेच विद्यालयातील विज्ञान शिक्षक माळवे पी. के. यांनाही सदरच पुरस्कार जाहीर झाल्याने त्यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. या प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक एस. एम. वानगोता, पर्यवेक्षक श्रीमती सोमानी व श्री शिंदे, तसेच शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सत्कार समारंभात शिक्षकांनी बेदमुथा मॅडम यांच्या शैक्षणिक कार्याची उजळणी केली आणि त्यांच्याकडून विद्यार्थ्यांना मिळालेल्या प्रेरणादायी शिक्षणपद्धतीचे कौतुक केले.

जिल्हा पातळीवर विज्ञान आणि गणित विषयांकडे विद्यार्थ्यांचा कल वाढविण्यासाठी अशी कार्यतत्पर शिक्षकवृत्ती आवश्यक आहे. ग्रामीण व अर्धशहरी भागातील शाळांमधून राष्ट्रीय स्तरावर विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक बनवणे हे सोपे काम नाही. परंतु श्रीमती बेदमुथा यांनी सातत्य, प्रयोगशीलता आणि विद्यार्थ्यांशी आत्मीय नातं जपत हे साध्य केलं आहे. त्यांच्या या सन्मानामुळे जालना जिल्ह्याच्या शिक्षण क्षेत्राला नवा आदर्श मिळाला असून, इतर शिक्षकांसाठी हे प्रेरणादायी उदाहरण ठरणार आहे.

# श्रीमती जे.बी.के विद्यालयाच्या यशात मानाचा तुरा

**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी** - शहरातील नामांकित नवभारत शिक्षण संस्थेच्या श्रीमती.जे.बी.के विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी कु. आकांक्षा रवींद्र पैठणेची सेंट्रल गव्हर्नमेंट ए.आय.एम.एस नागपूर येथे नर्सिंग ऑफिसर म्हणून निवड झाली आहे. कु.आकांक्षा रवींद्र पैठणे ही कुंभारझरी सारख्या ग्रामीण भागातील, सामान्य कुटुंबातील विद्यार्थीनी शिक्षणासाठी टेंभुर्णी. शहरातील श्रीमती.जे. बी.के.विद्यालयात दाखल झाली. मुळातच हुशार, गुणी, नम्र, व मेहनती असलेल्या आकांक्षाने , आपल्या परिस्थितीची जाणीव ठेवून अभ्यासात मेहनत घेतली, इ.१०वी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्यानंतर, छत्रपती संभाजी नगर येथील नामांकित ज्ञानदीप फाउंडेशनचे संचालक. गोविंद काबरा,यांनी आकांक्षा ला आपल्या डि.एफ.सी. क्लास मध्ये मोफत प्रवेश दिला, त्या ठिकाणी निटवैद्यकीय परिक्षेची पूर्वतयारी करून आकांक्षा रवींद्र पैठणे ही नर्सिंग अभ्यासक्रमाला पात्र ठरली. त्यानंतर स्पर्धा परीक्षेची तयारी करून स्पर्धा परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊन सेंट्रल गव्हर्नमेंट ए.आय.एम. एस.नागपुर येथे तिची नर्सिंग ऑफिसर म्हणून निवड झाली आहे. एका सामान्य कुटुंबातील ही विद्यार्थीनी पालकांच्या भक्कम पाठिंब्यामुळे, तसेच डि.एफ.सी.चे संचालक. गोविंद काबरा, विद्यालयातील शिक्षक. एस.बी.बोरकर, यांच्या मार्गदर्शनाखाली तीने यशस्वी वाटचाल करीत हे यश संपादीत केले. या अगोदर ही श्रीमती.जे.बी.के विद्यालयातील प्रत्येक वर्षी इ.१० वीत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालेल्या दोन विद्यार्थ्यांना छत्रपती संभाजी नगर येथील:- ज्ञानदीप फाउंडेशनने मोफत शिक्षणाची व क्लासची सुविधा उपलब्ध करून दिल्या मुळे विद्यालयाचे विद्यार्थी डॉ.उमेश लिंबाजी जाधव (एम.बी.बी.एस,) प्रतिभा सपकाळ (नर्सिंग) हरिदास पुंगळे (रेल्वे लोको पायलट)सोहिल साजिद शेख (बी.फार्मसी) वैश्नवी देशमुख या सारख्या किती तरी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना यशस्वी वाटचाल करता आली आहे. विद्यार्थ्यांना मोफत क्लासची सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या ज्ञानदीप फाउंडेशनचे योगदानही महत्त्वाचे आहे. नवभारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष. संजय काबरा, उपाध्यक्ष. जमिर शेख सर, सचिव. सत्यनारायण सोनी, जेष्ठ संचालक. मधुकर निकम,संचालक विश्वनाथ सांगुळे, संचालक. सुभाष राठी, प्रल्हाद टेंभुर्णीकर, संचालक. प्रा.डि.एस. देशमुख, ड.प्रेमसुख काबरा, प्रदिप काबरा,प्राचार्य. व्हि.के.जाधव एस.बी.बोरकर, रमेश इंगळे, संजय कुलकर्णी, कैलास भुतेकर, भिवसन ससाणे, डि. एस.उखर्डे, समाधान कांबळे, राजेंद्र जगताप, रवींद्र मोरे,प्रा. सुनिल बनसोडे ,प्रा डॉ.अरूण आहेर,प्रा.रामदास भांगे,प्रा के.जी.जाधव,प्रा.गजानन धोटे,प्रा.डॉ.आनंद जाधव, वासुदेव क्षिरसागर, सुनिल सकुंडे,मंजुषा भिलावेकर ,एफ.ए.शेख, ज्योतीताई जाधव,राजुभाऊ डोमळे, विजया लंबे, नागोराव देशमुख, दिपक देशमुख, आदींनी आकांक्षा पैठणे हिच्या निवडी बद्दल अभिनंदन केले आहे.



# श्रीमती.जे.बी.के विद्यालयाच्या सोहम पवारची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी** - शहरातील नामांकित नवभारत शिक्षण संस्थेच्या श्रीमती.जे.बी.के विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालयात इ.१०वीत शिक्षण घेत असलेल्या सोहम शांताराम पवार याने छत्रपती संभाजी नगर युवक व क्रीडा संचालय पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय छत्रपती संभाजी नगर यांच्या वतीने आयोजित व नुकत्याच पार पडलेल्या विभागीय स्तरावरील वेटलिफ्टिंग क्रीडा स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला असुन, राज्य स्तरावरील होणार्या वेटलिफ्टिंग स्पर्धे साठी निवड झाली आहे, त्याच्या या यशस्वी चमकदार कामगिरी बद्दल नवभारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष. संजय काबरा, उपाध्यक्ष. जमिर शेख सर, सचिव. सत्यनारायण सोनी, जेष्ठ संचालक. मधुकर निकम, संचालक. सुभाष राठी, विश्वनाथ सांगुळे, संचालक प्रा. दत्ताजीराव देशमुख, ड.प्रेमसुख काबरा, प्रदिप काबरा, प्राचार्य. व्हि.के.जाधव, एस.बी.बोरकर, आदींनी अभिनंदन केले आहे.क्रीडा विभाग प्रमुख कैलास भुतेकर,क्रीडा मार्गदर्शक राजेश शेवाळे, पालक शांताराम पवार यांचे सोहम पवार ला मार्गदर्शन लाभले,सर्व शिक्षक,प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी बंधु भगिनी आदींनी सोहम चे अभिनंदन केले आहे, तसेच १० नोव्हें २०२५रोजी मनमाड येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.




# मनोज जरांगे यांच्यासह धनंजय मुंडे व इतर १० ते १२ जणांची नार्को टेस्ट व ब्रेन मॅपिंग व्हावे

## जालना पोलीस अधीक्षकांकडे शिष्टमंडळाचे निवेदन



**जालना । प्रतिनिधी** - मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी स्वतःच्या आणि इतर काही जणांच्या नार्को टेस्ट व ब्रेन मॅपिंग करण्याची मागणी केली आहे. आज दुपारी सुमारास जरांगे पाटील यांच्या शिष्टमंडळाने जालना जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांची भेट घेऊन यासंदर्भात निवेदन सादर केले.

जरांगे पाटील यांनी अलीकडेच आपला घातपात घडवून आणण्याचा कट काही लोकांनी रचल्याचा गंभीर आरोप केला होता. त्यांनी या कटाचा सूत्रधार राज्याचे मंत्री धनंजय मुंडे असल्याचे म्हटले होते. त्यावर धनंजय मुंडे यांनी पत्रकार परिषद घेऊन स्वतःची नार्को टेस्ट व ब्रेन मॅपिंग करण्याची मागणी केली होती. त्यानंतर आता मनोज जरांगे यांनीही यासंदर्भात ठाम भूमिका घेत माझ्यासह धनंजय मुंडे आणि या कटात सामील असलेल्या १० ते १२ जणांची नार्को टेस्ट व ब्रेन मॅपिंग करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

या मागणीसाठी जरांगे पाटील यांच्या शिष्टमंडळाने जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात भेट दिली. यावेळी मराठा बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. जरांगे यांनी निवेदनात म्हटले आहे की, सत्य समोर यावे म्हणून मी स्वतःही नार्को टेस्ट व ब्रेन मॅपिंगसाठी तयार आहे. मात्र केवळ माझीच नव्हे, तर या संपूर्ण कटाशी संबंधित सर्वांच्या चाचण्या एकत्र केल्या गेल्या पाहिजेत.

शिष्टमंडळात संघटक कार्यकर्ते आणि मराठा आंदोलनाशी निगडित पदाधिकारी उपस्थित होते. पोलीस अधीक्षकांना देण्यात आलेल्या निवेदनात संपूर्ण घटनेचा तपशील देण्यात आला असून, या प्रकरणात निष्पक्ष चौकशी होऊन सत्य बाहेर यावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. निवेदन स्वीकारल्यानंतर पोलीस प्रशासनाने त्यासंदर्भात वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा करून कायदेशीर प्रक्रिया तपासली जाईल, असे संकेत दिले आहेत.

# नाटिकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांत कायद्याविषयी जनजागृती अभियान

## राष्ट्रीय विधी सेवा सप्ताहनिमित्त विशेष उपक्रम

**जालना । प्रतिनिधी** - जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाऊन, इनरव्हील क्लब ऑफ जालना होरायझन आणि पोलीस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय विधीसेवा सप्ताहानिमित्त राष्ट्रीय हिंदी विद्यालयाच्या इंग्लिश माध्यम शाळेत मुलांमध्ये कायद्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी नाटिकांचे सादरीकरण करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे अध्यक्ष सतीश बागडिया आणि मुख्याध्यापिका सौ. रिटा टंडन होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून प्रमुख जिल्हा न्यायाधीश वर्षा मोहिते, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव नीतेश बंडगर, पोलीस उपाधीक्षक अनंत कुलकर्णी, इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा सौ. हेमा जयस्वाल, जयश्री राऊत, पूनम अग्रवाल , रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाऊनचे अध्यक्ष अंकित अग्रवाल, दीपक गोयल, ड. महेश धन्नावत, ड. अश्विनी धन्नावत आणि महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या अधिव्याख्याता ड. औममहेश्वरी जाधव यांची उपस्थिती होती.

यावेळी विद्यार्थ्यांनी विविध कायदेशीर विषयांवर नाटिका सादर केल्या. यामध्ये सौ. सारिका महाजन यांनी 'ग्राहक हक्क', सौ. सुरेखा उपरे यांनी 'लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण (पोक्सो) कायदा' आणि 'शिक्षणाचा हक्क', सौ. स्वाती मुथा यांनी 'ज्येष्ठ नागरिकांचे संरक्षण' आणि सौ. विद्या ठाकूर यांनी 'संवैधानिक कर्तव्ये' या विषयांवर आधारित नाटिकांचे आयोजन केले होते.भारतातील न्यायव्यवस्थेने वेळोवेळी विद्यार्थी आणि नागरिकांमध्ये कायदेशीर साक्षरतेच्या गरजेवर भर दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने अनेक निकालांमध्ये हे स्पष्ट केले आहे की, कायद्याचे ज्ञान केवळ वकिलांपुरते मर्यादित न राहता ते सर्वसामान्यांपर्यंत पोहोचले पाहिजे. नागरिकांना त्यांच्या हक्कांविषयी सक्रियपणे माहिती देणे हे व्यवस्थेचे कर्तव्य आहे. अलीकडे मुलांमधील संमतीने असलेल्या संबंधांमध्ये 'लैंगिक




अपराधांपासून बालकांचे संरक्षण (पोक्सो) कायद्या'चा गैरवापर होत असल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने चिंता व्यक्त केली आहे आणि या विषयावर कायदेशीर जागरूकता होणे गरजेचे आहे, असे मत प्रकट केले आहे. प्रमुख जिल्हा न्यायाधीश वर्षा मोहिते यांनी आपल्या भाषणात सांगितले की, व्याख्यानांपेक्षा नाटिकांसारख्या माध्यमातून मुलांना कायद्याचे आणि नागरी जाणिवांचे धडे सहज मिळतात. रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाऊनचे अध्यक्ष अंकित अग्रवाल म्हणाले की, रोटरी कायदेशीर जागरूकता वाढवण्यासाठी अशा नाटिकांना प्रोत्साहन देईल. कायदेशीर जागरूकता व ज्येष्ठ नागरिकांच्या शिक्षणात रोटरीला सहभागी करून घ्यावे. इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा सौ. हेमा जयस्वाल यांनी 'पोक्सो' कायद्याबद्दल जागरूकता ही काळाची गरज असल्याचे नमूद केले. ड. महेश धन्नावत यांनी ग्राहक जागृतीसोबतच ज्येष्ठ नागरिकांचे हक्क आणि शिक्षणाच्या हक्काबाबत जागरूकता निर्माण करण्याची गरज असल्याचे सांगितले. ड. जाधव यांनी सांगितले की, विधीच्या विद्यार्थ्यांनी शाळांमध्ये जाऊन नाटिका सादर कराव्यात, जेणेकरून ते स्वतः कायद्याबद्दल जागरूक होतील आणि कायदेशीर जागृतीही निर्माण होईल.पोलीस उपअधीक्षक अनंत कुलकर्णी यांनी पोलीस अधीक्षक अजय बन्सल आणि अतिरिक्त पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांच्या नेतृत्वाखाली पोलीस विभाग बालस्नेही आणि लोकाभिमुख पोलीस स्टेशन निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले. ते पुढे म्हणाले की, मुलांनी कोणत्याही परिस्थितीला घाबरू नये, पोलीस आणि संपूर्ण यंत्रणा विद्यार्थ्यांच्या पाठीशी आहे. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शिक्षक शेळके केले. या उपक्रमाने विद्यार्थ्यांना मनोरंजनातून कायद्याचे महत्त्वपूर्ण ज्ञान दिले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.